जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

# भोगवटाप्रमाणपत्र

# OCCUPANCY CERTIFICATE

जा.क्र.२०१७/मशाका/जमीन-१/प्र.क्र.३८१
मौजे.शेंद्रबन,ता.औरंगाबाद
दिनांक :- ०८.१२.२०१७.

भोगवटा प्रमाणपत्र धारणकरणा-याचे नावं मे.विजया लक्ष्मी डेव्हलपर्स तर्फे श्री.गणेश्स नारायण यादव व इतर,रा.औरंगाबाद,ता.जि.औरंगाबाद प्रमाणित करण्यात येते की,न.भू.क्र./स.नं./**गट.नं.१०९** मधील भुखंड क्र **४** ते **१२** बांधकाम बाबत मौजे.शेंद्राबन.ता.औरंगाबाद मिळकतीवर भागशः/संपूर्ण/तळमजला/पहिला मजला/ दुसरामजला/ साठी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक.१३५७.दि.२०.०६.२०१६ नुसार सादर केलेल्या भोगवटा प्रमाणपत्राच्या आधारे सदर बांधकाम झालेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे/अटीवर देण्यात येत आहे.

१. सदर प्रकरणाचे स्ट्रक्चरल स्टॅबेलीटी प्रमाणपत्र सादर केलेले असुन त्याबाबत स्ट्रक्चरल इंजिनिअर/ वास्तुशास्त्रज्ञ यांची जबाबदारी राहील. .
२. या कार्यालयाचे रहीवास वापरासाठी मंजुरीची शिफारस केलेल पत्र क्र.३२४,दिनांक २४.०२.२०१२ व पत्र क्र.५८८,दिनांक १०.०३.२०१६ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. पुर्व मंजुर बांधकाम परवानगी नकाशा मधील बांधकामापेक्षा अतिरिक्त बांधकाम भविष्यात केल्यास या बाबत संपुर्ण जबाबदारी संबंधीत वास्तुविशारद / जमीन मालक यांची राहील.
४. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद कार्यालयाचे अकृषीक आदेश क्र.प्र.क्र.६२६,दि १३.०४.२०१२ मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
५. या कार्यालयाचे बांधकाम परवानगीचे शिफारशीचे पत्र क्र.१३५७,दिनांक.२०.०६.२०१६ व मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे बांधकाम परवाना आदेश क्र.६२६,दिनांक.१५.०७.२०१६, मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधकारक राहील.
६. इमारत स्ट्रक्चरल ऑडीट दर पाच (५) वर्षांनी करुन घेणे जागामालक,यांचेवर बंधकारक राहील.
७. सदरील भूखंडाचे हद्दी व चतु:सिमा बाबत वाद उत्पन्न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मिळकतधारक/विकास आणि अर्जदार तथा वास्तुविशारद/इंजिनीयर/सुपरवायझार यांची राहील.
८. सदर भोगवटा प्रमाणपत्र इमारतीचे मर्यादेपर्यंतचे आहे.इमारतीचे स्थानांकन,भूखंडाचे क्षेत्र,हद्दी,चतु:सिमा इत्यादी बाबत वाद निर्माण झाल्यास तसेच विकास योजनेनुसार भूखंडाचे स्थानाबाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारावर राहील,त्या करीता जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही.
९. सदरच्या भोगवटा प्रमाणपत्राव्यतिरिक्त भविष्यात प्रत्यक्ष जागेवर अतिरिक्त बांधकाम आढळल्यास ते अनाधिकृत विनापरवानगी समजून त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
१०. बांधकाम परवानगी मध्ये नमुद केलेल्या अटी अर्जदारास बंधकारक राहतील.
११. विकासकावर विकसित इमारतीचे बाबत इतर कायद्दयानुसार असलेल्या तरतुदी प्रमाणे सर्व बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी राहील.
१२. सोबतच्या नकाशा प्रमाणे भूखंड क्र.४ ते १२ मधील **(Building Type-B)** चे क्षेत्र **५४६.४८** चौ.मि.साठी एकूण बांधकाम क्षेत्र. **५४६.४८** चौ.मि. करीता भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असून चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I ) १.१६५ वापरला आहे.

**(मुळ प्रतीवर मा.जि.अ.यांचे स्वाक्षरी असे)**

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

Mahanger Completion.doc 13

Scanned by CamScanner